# ई स्पर्श

ऑक्टोबर २०१२





श्री विजय पांढरे यांचे
इंजिनियर्सना खुले पत्र

ई साहित्य प्रतिष्ठान ®

# इत्यर्थ :

वर्ष पहिले, अंक पाचवा.

ऑक्टोबर २०१२

संपादक मंडळ

नाम गुम जायेगा : ठाणे महाराष्ट्र.

तनवीर सिद्दीकी : बिलासपुर छत्तीसगढ.

सृजा : औरंगाबाद महाराष्ट्र.

मुखपृष्ठ व अंतर्गत सजावट : कनक वाईकर ( औरंगाबाद, महाराष्ट्र)

©लेखनाचे सर्व हक्क संबधित लेखकांच्या स्वाधीन.

काही छायाचित्रे गुगल सर्च वरून घेतली आहेत. त्यांचे हक्क संबंधित छायाचित्रकारांच्या स्वाधीन.

© ई साहित्य प्रतिष्ठान® २०१२

इत्यर्थ हे मुक्तपीठ आहे. यातील मते लेखकांची वैयक्तिक मते आहेत. संपादक मंडळ त्यांच्याशी सहमत असेलच असे नाही

संपर्क : ई साहित्य प्रतिष्ठान

अकरावा मजला (जी ११०२)

ईटर्निटी

ईस्टर्न एक्सप्रेस हायवे

ठाणे. ४००६०४

वेबसाईट: http://www.esahity.com

ईमेल: esahity@gmail.com

मोबाईल: 9869674820

# या अंकात...

संपादकीय

| | | |
|---|---|---|
| वर्गीस कुरियन | : | वसंत नायक |
| अवयव | : | महेंद्र कुलकर्णी |
| कोयत | : | किशोर करंजकर |
| स्वगत | : | विनीता देशपांडे |
| पॉलिसी | : | नेत्रा कुलकर्णी |

श्री विजय पांढरे यांचे खुले पत्र

संपादकीय

इत्यर्थचा हा अंक मनोरंजनासाठी नाही.

अस्वस्थ वाटतंय.

स्वास्थ्य बिघडलं की अस्वस्थ वाटायचंच. स्वास्थ्य बिघडतं म्हणजे काय? एखादा अवयव दुखावला जातो. किंवा नीट काम करत नाही.

पण हे दुखणं वेगळंच आहे . एखादा अवयव दुखावला आहे हे इतर अवयवांना जाणवतच नाहीये. पोट बिघडलंय तरी हात तोंडात भसाभस माल भरताहेत. हृदयात कोलेस्टोरॉल वाढलं तरी पोट तुपात तळलेली भजी मागतंय. डोकं दुखतंय तरी कानांना ढणा ढणा म्युझिक ऐकायचंय. पाय दुखतोय पण हातांना क्रिकेट खेळायचंय.

विचित्र वाटत असेल, पण समाजाचं सध्या असंच झालंय. सहवेदनाच नाहीशी झालीय. संवेदना संपून गेलीय. शेजारच्या घरात कोणी रडतंय तरी आमचं घर मालिका बघण्यात दंग आहे. आणि जेव्हा जेव्हा आमच्या घरावर संकट कोसळतं तेव्हा आम्ही शेजाऱ्याच्या दगडीपणावर बोटं मोडतो. महाराष्ट्राच्या काही भागांत पाण्याचा अकाल आहे. तर काही भागांत चंगळ आणि अतिरेक. एकीकडे शेतीला पाणी मिळत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. पाणी हा लोकांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. अनेक कुटुंबांतून दोन दोन माणसे दिवसभर पाणी भरण्यासाठी राबत असतात. अनेक जिल्ह्यांतून आंघोळ दोरीच्या बाजल्यावर बसून करतात आणि खाली परातीत उतरलेले पाणी पुन्हा “दुसऱ्या” कामाला वापरतात. अशी या सुजलाम सुफ़लाम राज्याची परिस्थिती आहे.

अशा वेळी महाराष्ट्राच्या करांतून निर्माण होणारा पैसा पाण्याच्या योग्य नियोजनासाठी वापरला जाणे योग्यच आहे. त्यामुळे एका भागात होणारा पूर आणि दुसऱ्या भागात होणारे अवर्षण हे दोन्ही टाळले जावेत अशी अपेक्षा आहे.

परंतू हा पैसा योग्य तऱ्हेने न वापरला गेला तर हे दोन्ही प्रश्न अधिक भीषण होतात. धरणांचे काम नीट झाले नाही तर पाणी वाया जाते. धरणे जर पुरेशी मजबूत नसतील तर लाखो लोकांचा जीव टांगणीला लावला जातो. सध्या राज्याचे चीफ़ इंजिनियर, नाशिकचे श्री विजय पांढरे यांनी हा प्रश्न धसाला लावला आहे. आणि या प्रश्नाकडे दोन राजकीय व्यक्ती किंवा पक्षांमधील लढाई न समजता आपल्या स्वतःच्या राज्यातील लोकांच्या जीवाभावाचा प्रश्न म्हणून समजला गेला पाहिजे.


पण इथे लोकच संवेदनाहीन आहेत. या सगळया प्रश्नाकडे लोक एखाद्या क्रिकेटच्या मॅचसारखे पहातात. कोण जिंकणार? कोण आऊट होणार? अरे कोणीही जिंकला तरी आपणच हरणार ना! पाण्यावाचून वणवणणार ते आपणच ना? उद्या आपलाच नातू किंवा नात या पुरात वाहून गेले तर...? सातारजवळचं तारळी उद्याचं पानशेत झालं तर? हे प्रश्नही लोकांच्या मुर्दाड मनाला शिवत नाहीत.


कोणाला काही पडलेली नाही.

म्हणून अस्वस्थ वाटतंय.

# डॉ. वर्गीस कुरियन

वसंत नायक
vgnayak05@yahoo.co.in
mailto:vgnayak05@yahoo.co.in





खरे तर मार्टीन ल्युथर किंग आणि वर्गीस कुरियन या दोन वेगवेगळया देशातील आणि वेगवेगळया विषयांसाठी झटलेल्या व्यक्ती आहेत. त्यांच्या दोघांच्याही कार्याची तुलना करण्या इतका अभ्यास माझा नाही. परंतु किंग यांचे सर्वात गाजलेले एक भाषण आहे “माझे एक स्वप्न होते” (I have a Dream) या वाक्याने ते जगात प्रसिद्धआहे आणि वर्गीस कुरियन यांच्या आत्मचरित्राचेशीर्षक आहे “I too had a dream”- माझेही एक स्वप्न होते. वर्गीस कुरियन यांना हे शीर्षक का घ्यावेसे वाटले हे मला माहित नाही. पण ज्या वेळेस कुरियन यांनी “The Billion Litre Idea” जुलै १९७० साली सुरू केली त्याच्या ७ वर्षे अगोदर १९६३ साली झालेले किंग यांचे हे जगप्रसिद्ध भाषण आहे. त्यामुळे मार्टीनच्या भाषणाचा आणि या शीर्षकाचा काही संबंध असावा असे वाटते.

कुरियन दुग्ध व्यवसायात अगदी अपघाताने आले. खरे तर ते केरळ मधील एका सुखवस्तू कुटुंबातील होते. शेती अथवा दुग्ध व्यवसायाशी त्यांचा कोणताही संबंध नव्हता. मेटालर्जी या विषयात त्यांचे प्राविण्य होते. सरकारी योजनेतून ते दुग्ध व्यवसायाशी संबंधित शिष्यवृत्तीमुळे परदेशात गेले. सरकाने केलेल्या नेमणुकीमुळे ते आणंदला गेले व नंतर सहकारी दूध चळवळीशी जोडले गेले. किंग मात्र स्वत: निग्रो होते आणि अमेरिकेतील समाज व्यवस्थेत निग्रोंना जी सापत्न वागणूक मिळत होती त्याचे ते सुध्दा बळी होते. अन्याय्य अशा "समान पण वेगळे" –Equal But Different या धोरणाच्या विरोधातील चळवळीशी ते प्रथम पासूनच जोडले गेले.

मार्टीन स्वतःच्याच देशात निग्रोंच्या स्वातंत्र्यासाठी लढा उभा करत होते; त्याच वेळेस कुरियन, आजही या देशात ज्याचे योगदान मोठे आहे त्या शेतकऱ्याला, खऱ्या अर्थाने आर्थिक स्वातंत्र्याचा अनुभव कसा घेईल या साठी झटत होते. दोघांच्याही जीवनात सामान्य माणूस, मानवी मूल्ये, त्याचे आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य यांचे महत्व सर्वात जास्त होते. १९४६ च्या समाजाचे चित्र वर्गीस यांच्या चरित्रात वाचायला मिळते ते असे आहे –"सावकारी पाश, सामाजिक अनिष्ट रुढी व वर्ण जातीभेद यात दबलेला". अमेरिकेतील समाज जीवन मार्टीन यांच्यात शब्दात सांगायचे तर –"घटनाकारांनी सर्वांना दिलेली स्वातंत्र्याची व समान अधिकाराची प्रॉमिसरी नोट निग्रोंना नाकारणारा". भारतात होवू घातलेला वर्गीस यांचा प्रयोग रूढार्थाने कोणाच्या विरोधात नव्हता. शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांच्या सुप्त शक्तीला जागृत व संघटित करून, सहकारातून प्रगतीकडे नेवून त्यांना आर्थिक व सामाजिक स्थान मिळवून देणारा होता. अमेरिकेतील लढा प्रथम दर्शनी गोरे विरुद्ध निग्रो असा दिसत असला तरी कितीतरी वेळा चिथवण्याचे प्रसंग येऊनही मार्टीन यांनी त्याला कधीही तसे वळण येवू दिले नाही. त्यांनीही निग्रोंच्या सुप्त शक्तीला जागृत करून, संघटीत करून परंतु जुलमी कायद्याविरुद्ध असहकाराने आपले कार्य पुढे नेले.

किंग यांनी जे असहकाराचे आंदोलन केले होते त्यात आणि कुरियन यांनी जे सहकाराचे पर्व अमूलच्या माध्यमातून सफल केले यांमध्ये गांधी विचाराचे प्रतिबिंब

दिसते. किंग यांनी तर स्पष्टपणे गांधीजींच्या अहिंसा व सत्याग्रह या मार्गाचे अनुकरण केले व तसे स्पष्टपणे नमूदही केले आहे. वर्गीस ज्या कैरा सहकारी दुध उत्पादक संघात दाखल झाले त्याचे सर्वेसर्वा श्री.त्रिभुवनदासजी हे गुजरातमधील थोर गांधीवादी होते. त्यांच्या प्रेरणेमुळेच आपण तेथे राहिलो हे कुरियन नमूद करतात. दोघांच्याही कार्याचा केंद्रबिंदू सामान्य माणूस आर्थिक व सामाजिक दृष्टीने स्वतंत्र कसा होईल हा राहिला आहे.

मोठ्या माणसांची सावली इतिहासावर किती दूरवर पडते त्यावर त्यांचे मोठेपण असते असे म्हणतात. त्या दृष्टीने आपण ल्युथर किंग व कुरियन यांचे स्वप्न काय होते व आज ते कोठे पर्यंत आले आहे ते जाणून घ्यायला हवे. ल्युथर किंग आपले स्वप्न प्रगट करताना सांगतात. अमेरिकन स्वप्नात ज्याची मुळे आहेत असे माझे स्वप्न आहे. माझे एक स्वप्न आहे - एक ना एक दिवस हे राष्ट्र “जन्मत: सर्व माणसे समान आहेत” या स्वयंसिद्ध सिद्धान्ताचा पूर्णपणे अंगीकार करील. माझे एक स्वप्न आहे की, एक दिवस माझी मुले अशा देशात जगतील की जेथे त्यांची योग्यता त्यांच्या कातडीचा रंग ठरविणार नाही तर त्यांचे चारित्र्य ठरवेल. भेदांच्या भिंती भुईसपाट होतील. मार्टीन यांचे भाषण बरेच मोठे आहे. येथे त्याचा फक्त आशय दिला आहे. समाजात बदल लगेच मान्य होत नाहीत. मार्टीन ल्युथर किंग यांची, तसेच त्यांच्या मागे ठाम उभे राहिलेल्या राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांचीही हत्या करण्यात आली. परंतु आज त्याच अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा हे निग्रोवंशीय आहेत यातच सारे काही आले.

स्वप्नांच्या संदर्भात स्वामी विवेकानंदांचे एक प्रसिद्ध वाक्य आहे ते कुरियन आणि किंग या दोघांच्या चरित्रात पूर्णपणे अनुभवायला येते.“Take up one idea. Make that one idea your life - think of it, dream of it, live on that idea. Let the brain, muscles, nerves, every part of your body, be full of that idea, and just leave every other idea alone. This is the way to success.”- Swami Vivekanada.

कैरा जिल्ह्यात १९४८ साली सुरु झालेल्या अमूलच्या प्रयोगाच्या वेळी जेम तेम २०० लिटर दूध संकलीत होत होते ते आता NDDB(National Dairy Development Board) च्या माध्यमातून कोट्यावधी लिटर पर्यंत पोहचले आहे. नेसले, ग्लाक्सो या सारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या मक्तेदारीला मोडून काढत अमूल हा सर्वात मोठा ब्रॅन्ड झाला आहे. भारतातल्या दुधाच्या बाजारपेठेत मक्तेदारी मिळविण्याच्या प्रयत्नातील आंतरराष्ट्रीय कुटील कारस्थाने धुळीला मिळाली आहेत. भारतात धवल क्रांती घडून आली. भारत दुध उत्पादनात स्वयंपूर्ण करण्याचे कुरियन यांचे स्वप्न साकार झाले आहे. मात्र अमूल सोडता अन्य ठिकाणी राजकारणी लोकांनी दुधाची सहकार चळवळ ताब्यात घेतल्यात जमा आहे. नवे दुग्ध सम्राट जन्माला आले आहेत. वर्गीस कुरीयन यांचे दुध उत्पादनाच्या माध्यमातून सामान्य शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याचे ध्येय गुजरात मध्ये अमूलच्या माध्यमातून काही प्रमाणात साकार झाले असले तरी इतरत्र मात्र तशी स्थिती नाही. त्यांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी कोण नवीन कुरियन भविष्याच्या उदरात आहे कोणास ठावूक. असे कुरियन निर्माण होण्याची सर्व क्षेत्रात आवश्यकता आहे. मार्टीनच्या चळवळीतले एक प्रसिद्ध गीत आहे. -



We shall overcome , We shall Overcome, We shall overcome someday

O deep in my heart, I do believe, We shall overcome someday.

आपल्या येथे या गीताचे हम होंगे कामयाब एक दिन असे गीत तयार झाले आहे. नवीन कुरियन निर्माण व्हावेत म्हणून प्रयत्न करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली. हम होंगे कामयाब एक दिन.

**आनंद देणारी बातमी : - खरे तर शनिवारी हा लेख लिहून झाल्यावर रविवारी सकाळीच श्री. विनीत गोयंका यांची भेट झाली. त्यांच्याकडे केशवसृष्टी – भायंदर येथील कृषी विद्यालयाची जबाबदारी आहे. बोलण्याच्या ओघात त्यांनी आणंद येथील कृषी प्रयोगाची माहिती दिली व आणंद कृषी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. मदन गोपाल वार्ष्णेय यांचा नंबर दिला. डॉ. वार्ष्णेय यांनी आणंद मधल्या प्रयोगाचे खरे जनक देवासचे श्री. दीपक सचदे आहेत असे सांगितले. श्री. सचदे यांनी केवळ १००० स्क्वे.फूट जागेत ५ जणांचे कुटुंब ज्यात एक गाय व बैल यांचा चाराही सामील आहे, अशा कुटुंबाचा चरितार्थ वर्षभर व्यवस्थित चालेल अशा प्रकारची शेती आपल्या मालपाणी ट्रस्टच्या माध्यमातून यशस्वी करून दाखविली आहे. यासाठी पाणी जास्त लागत नाही किंवा जास्त खत लागत नाही तर उपलब्ध गाय व बैल यांचे शेण व गोमुत्र यांचा उपयोग करून तसेच बायोमॉस चा उपयोग करून जमिनीचा उपजावू स्तर कित्येक पटीने वाढविला व त्यामुळे सर्व प्रकारचे उत्पादन त्या जागेत घेतले जाते असे सांगितले. आणंदमध्ये वरील प्रयोगाची चाचणी अनेक ठिकाणी घेण्यात येवून त्याचे परिणाम उत्साहवर्धक असल्याचे व शेतकऱ्यांच्या आत्महत्या निश्चित टळू शकतात असेही सांगितले. मध्यतंरी औरंगाबाद येथील डॉ. हेडगेवार रुग्णालयातील डॉक्टरांनी तेथील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांचे उत्पन्न अनेक पटीने वाढविल्याची एक मेल आली होती. सोबत फोटोही होते. वरील दोन्ही उदाहरणे दुसरी हरित क्रांती कशी असेल याचा वस्तुपाठ देणारी आहेत. हरित क्रांती बरोबरच दुग्धक्रांती होईलच यात शंका नाही. डॉ. कुरियन यांना ही सर्व मंडळी आपल्या कार्यातून आश्वासन देत आहेत - हम होंगे कामयाब एक दिन.**

www.esahity.com

# अवयव


महेंद्र कुलकर्णी
kbmahendra@gmail.com


मानवी शरीराचे अवयव विकायला कायद्याने बंदी आहे, या विषयावर 'मी  मराठी" या साईट वर एक चर्चा वाचण्यात आली, थोडा वेळ विचार केला, आणि विसरलो सुद्धा!  दुसऱ्या दिवशी पेपर उघडला तर दोन बातम्या दिसल्या एक बातमी म्हणजे एका माणसाने बायकोला किडनी विकायला जबरदस्ती केली म्हणून तिने पोलिसांकडे धाव घेतली, आणि दुसरी बातमी , एका माणसाने बंगाल मधल्या गावातून पळवून आणलेल्या १७ वर्षाच्या मुलीला केवळ ६ हजार रुपयात कुंटणखान्यात विकले.

दर वर्षी बकरी ईद च्या दिवशी पेपर मध्ये बातमी असते, की एक कुठला तरी बकरा , की ज्याच्या पाठीवर अल्लाह लिहिलेले आहे, किंवा ७८६ ही अक्षरं आहेत, तो बकरा पाच लाख किंवा प्रसंगी जास्त  किमतीत विकला गेला. बकऱ्याचं वजन साधारण ३० किलॊ समजा, म्हणजे प्रती किलॊ काय भाव पडतो?  फार नाही , फक्त रू.१६६६६.००!



चिकन ८०-१०० रुपये किलो मिळतं.. त्या हिशोबाने त्या कुंटणखान्यात विकलेल्या मुलीचे वजन जर पन्नास किलो असेल, तर तिचा भाव साधारण पणे १२० रुपये किलो पडला असेल नाही? विचारात पडलात ना? मानवी शरीराची किंमत ही बकऱ्या पेक्षा पण कमी!

मानवी शरीराची जडणघडण हे एक जगाच्या पाठीवरचा एक चमत्कारच नव्हे तर एक न सुटणारे कोडे आहे. तुम्हाला सगळं जग जरी दाखवत असले तरीही , तुमचे डोळे स्वतःला पाहू शकत नाहीत, कितीही आवाजाचा त्रास होत असला तरीही तुमचे कान स्वतःला झाकून घेऊ शकत नाहीत – त्या साठी त्याला हातांची गरज पडते. नाक सगळे वास घेऊ शकला, तरी तोंडात असलेल्या वस्तूचा वास घेऊ शकत नाही- अगदी एक इंचावर असले तरीही. डोकं खांद्यावर मानेने जोडलेलं असले, तरीही कधी विश्रांतीची वेळ आली, की डोकं टेकायला दुसऱ्याचा खांदा लागतो, स्वतःच्याच खांद्यावर स्वतःचंच डोकं टेकवता येत नाही. शरीराचा सगळा भार उचलणारे पाठीचे मणके, स्वतःचे ओझे उचलू शकत नाहीत...

परमेश्वराने वर दिलेल्या सगळया अवयवांना एकत्र करून निर्माण केलेल्या या मानवाने स्वतःसाठी नाही, तर दुसऱ्यांसाठी जगायचे असते. हे शरीरावर दिसणारे बाह्य अवयव, सौंदर्य वगैरे गोष्टींपेक्षा त्या मधे असलेला माणूस महत्त्वाचा – आणि त्याचं मोल कोणीच लावू शकत नाही.

कायद्याने जरी शरीराचे अवयव विकणे गुन्हा असला तरीही, काही खाजगी दवाखान्यात हा व्यवसाय खूप मोठ्या प्रमाणात केला जातो .



त्या मधे मग बरेचदा एजंट्स लहान गावाकडे जाऊन गरीब लोकांना किडनी विकायला तयार करतात. अहो, ज्याला एक वेळ खाण्याची भ्रांत आहे, त्याला जरी ३०-४० हजार देतो म्हंटलं, तर तो ही ऑफर सहजासहजी  नाकारू शकत नाही. एकाने किडनी विकली, की तो एजंट बनून गावातल्या इतर लोकांना तयार करतो किडनी विकायला.

जो पर्यंत एखाद्या बातमीचा आपल्यावर डायरेक्ट परिणाम होत नाही, तो पर्यंत कुठल्याही  गोष्टीकडे  आपण अगदी मनात कुठलेही विचार न येऊ देता अगदी मुर्दाड मनाने पाहू शकतो- मग ते शेतकऱ्यांच्या आत्महत्या असो, किंवा कुठलातरी झालेल्या अपघाताची बातमी असो,  किंवा वर दिलेली किडनी चोरीची बातमी असो.

शरीराच्या आत  असलेला कुठलाही अवयव  जरे किडनी,  लिव्हर, हार्ट वगैरे माणसाचे शरीर बंद पाडू शकतो,   पण शरीराच्या बाहेरचा अवयव  फक्त सौंदर्यात भर घालतो- आणि  त्याचा  आपल्या जिवंत रहाण्यावर काही परिणाम होत नाही.

वर दिलेली गोष्ट जरी खरी असली, तरी आपण फक्त आपल्या  बाह्य सौंदर्याची म्हणजेच बाहेर दिसणाऱ्या अवयवांची  जास्त काळजी घेतो, मुलं पिंपल्स चेहेऱ्यावर दिसले की एकदम कासाविस होतात, निरनिराळ्या क्रिम्सचा मारा सुरु करतात, गोरं होण्यासाठी पण बरीच औषधं आहेतच, केसांचे शांपू, चेहेऱ्यावरच्या सुरकुत्या घालवायचं क्रिम, वगैरे आहेतच. ब्युटी पार्लर मधे जाऊन पेडी क्युअर, मॅनी क्युअर , नखांची काळजी पण घेतात हल्ली स्त्रिया... पण  गोरं होण्यापेक्षा स्किन तजेलदार दिसायला हवी, मसल्सचं टोनिंग व्हायला हवं, चरबी  कमी व्हायला हवी ह्या महत्त्वाच्या गोष्टी आहेत ,पण त्या कडे लक्षं दिलं जात नाही.

ज्या गोष्टी आपल्या जगण्यावर, /आयुष्यावर सरळ परिणाम करतात , जसे खाणे, वजन, त्याकडे आपण पूर्ण दुर्लक्ष करतो.



सिगरेट, तंबाखू, दारू , इतर खाणं वगैरे गोष्टींमुळे आतल्या न दिसणाऱ्या अवयवांवर (लिव्हर, किडनी, फुफुस वगैरे) टॉक्सिन्सचा मारा करत असतो आणि स्वतःचंच आयुष्य कमी करून घेत असतो. नेमक्या ह्याच विचारांमधे , जीवन शैली मधे आपण बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

शरीराचे अवयव विकणे हा कायदा  नसता तर काय झालं असतं तर??? मी विचार केला की जर विकायचा म्हंटलं, तर  मी  स्वतःच्या शरीराचा केवळ कापलेली नखं आणि केस हे दोनच ( ह्यांना अवयव म्हणू शकत नाही ) विकू शकेन.. इतर एकाही अवयवाशिवाय जगणे शक्य होणार नाही मला. बिहार मधे काही शहरात तरूण मुलाला पळवून नेऊन त्याचे लग्न लावून देणे  हा प्रकार सर्रास चालतो,   त्याच प्रमाणे जर  हा कायदा नसता, तर लोकांना पळवून नेऊन त्यांचे अवयव विकायचा राजरोस पणे धंदा सुरु केला असता- आणि या मधे बिहार नाही, तर मुंबई सगळयात पुढे राहिले असते असे मला वाटते.

वर लिहिलेल्या  त्या सहा हजारात विकत घेतलेल्या मुलीला कुंटणखान्यात विकले म्हणजे तिच्याकडून पैसे वसूल करून घेण्यासाठी जर तिची किडनी विकली गेली, तर आजच्या बाजार भावाने एक लाख तरी मिळतील, डोळयांचा रेटीना , तिची स्किन जी स्किन बर्न पेशंट किंवा प्लास्टीक सर्जरी साठी वापरली जाऊ शकते, तिचं लिव्हर, तिच्या शरीराचा प्रत्येक भाग विकल्या गेला असता  .... जाऊ द्या , नुसता विचार जरी मनात आला, तरी अस्वस्थ होतंय..



# कोयत

किशोर करंजकर
karanjkar.kishor@gmail.Com



"औंदा, पप्याच लग्न करुन टाकुया. तेव्हढचं एक आपलं कोयत हुभा राहीलं, पाच पन्नास हजार होतीलं."

"बघा आली एखांदि पोरगी तर टाकुया उरकुन पटकन, मलाबी अस आता नकुसं वाटतया काम करायला."

हि वाक्य मराठवाड्यातील प्रत्येक खेड्यात ऐकायला मिळतील. तेही दिवाळीच्या १ महिना अगोदर. कारण ऊस तोडीचा मोसम तेव्हाच तर सुरु होतो.

दसरा संपला कि लगेच गावागावात चाहुल लागते ती मुकादम येण्याची. मुकादम आला की लगेच गावातल्या कोणातरी मोठ्या माणसाला हाताशी धरुन तो कोयते बघायला चालु करतो. आता तुम्ही म्हणाल की कोयत म्हणजे काय??



कोयत म्हणजे ऊस तोडण्याचे हत्यारं आणि 'आपलं कोयत हुभा राहील" म्हणजे कारखाना जोडप असेल तर एक कोयत्याचे पैसे देते. आणि एकटाचं माणुस असेल तर अर्धा कोयत्याचे पैसे देते. एका कोयत्याला ५० हजार ते ६० हजार रुपये देतात.

मुकादम आला म्हणजे गावातील सावकाराला तो पकडतो. कारण सावकाराने लोकांना पैसे दिलेले असतात. ते पैसे काढण्यासाठी सावकार मुकादमाला कोयत सापडून द्यायला मदत करतात. कारण कारखान्याने दिलेले पैसे मुकादमाने लोकांना दिले की लगेच सावकार त्यांची वसुली करुन घेतात, आणि त्याबद्दल त्यांना कमिशनही मिळते. ह्यामुळे मुकादमाचे काम फार सोपे जाते. मग ज्यांना ज्यांना कारखाना पैसे दिले जातात त्यांना गावात दसरा होई पर्यंत सगळ आवरुन ठेवण्याची मुदत असते. जर पैसे घेऊन माणुस पळुन गेला तर त्याची जिम्मेदारी त्या सावकाराची असते. लोकही पैश्याच्या लोभामुळे आपल्या मुलांची लवकर लग्नं करुन टाकतात. लहाणपणीच त्यांना कारखान्यावर कामासाठी पाठवले जाते.

बरं हि लोकं इतकी पागल आहेत की हे घेतलेले पैसे दारु आणि पत्त्यात संपवुन टाकतात. कारण इतके पैसे त्यांनी आयुष्यात कधीही पाहीलेले नसतात. आणि जर कोणी जुना ऊसतोडी कामगार असेल तर तो वर्षभर दारु प्यायला पैसे नसतात म्हणुन पितो.

मग एखाद्या बाजाराच्या दिवशी जावून सगळं लागणारं सामान घेऊन येतात. सामान तरी काय असतं? एखादी ट्रंक, ताडपत्री, ४ ते ५ बांबु झालं. बरं ह्या सगळया धांदलीत दसरा उलटुन जातो आणि कारखान्याच्या गाड्या (ट्रक, ट्रॅकटर) येतात मग गावात सगळी धांदल उडते. कारण दारु आणि पत्ते यात सगळे पैसे गेल्यानंतर ह्यांच्याकडे काहीच उरलेले नसते. मग एक पोतं ज्वारीसाठी परत सावकाराच्या दारात उभे. सगळा संसार एका ट्रंकेत घालून, लागणारा लाकुड फाटा गोळा करुन त्याची मोळी. ४ , ५ किडुक मिडुक भाडी घेऊन हे निघतात. निघाल्यावर पहील्यांदा ते कारखान्यावर जातात. तिथे जाऊन त्यांना कुठला भाग द्यायचा ते ठरवले जाते. त्यानुसार परत तो प्रवास चालु होतो. त्या गावात जाऊन मुकादम ठरवतो कि कुणाचा ऊस आधी न्यायचा त्यानुसार त्यांची टोळी त्यांच्या शेतात पडते. इथुन खरी त्यांची हालाकिची जिंदगी चालु होते.....

ज्या दिवशी हे शेतात गेले त्यादिवशी पासुन कामाला सुरुवात होते.सगळयात आधी हे लोक बांबु घेवुन त्याची झोपडी बांधतात. ती फक्त नावालाच असते. फक्त आपला संसार म्हणजे एक ट्रंक ठेवण्या पुरती.

जर दगड असतील तर चांगले नाहितर चुलीच्या दगडापासुन सगळी तय्यारी करावी लागते. तिन दगडाची चुल पेटवुन झाली की त्यांचा स्वयंपाक सुरु होतो. भाकरी आणि ठेचा मिरचीचा. बस. त्यातल्या त्यात हाल म्हणजे हे जर सकाळी असेल तर ठीक आहे पण जर टोळी रात्री गेली तर थंडीने पार वाट लागते....

तुम्हाला माहीत आहे का.....( सॉरी तुम्हाला कसं कळनार.) रात्री ज्या वेळेस आपण गरम दुलईत स्वप्नः पाहत असतो त्या वेळेस ती माणसे विझलेल्या शेकोटीच्या राखेला उगाचच फुंकर घालुन ऊब आणन्याचा प्रयत्न करत असतात. बरं ह्यांची चिल्लीपिल्ली तसेच आईला बिलगुन झोपलेली असतात. थंडीचा कहर काय कमी असतो म्हणुन वरुन रात्रीच कारखान्याची गाडी येते. तिला यायला वेळ नावाचा प्रकार नसतो. कधीही म्हणजे रात्री २ वाजता ३ वाजता. ज्यावेळेस थंडी आपल्या चरम सीमेवर असते त्यावेळेस. ह्यांना उठावं लागत.

उठल्या उठल्या लगेच ऊस तोडायला धावावं लागतं, ऊसाचे दोन प्रकार असतात एक आहे गावरान आणि दुसरा ७२० (एक प्रकार) दुसरा प्रकार तोडायला फार अवघड असतो कारण त्यावर बारिक काटे असतात.

ते एकदा हातात घुसले की दिसतही नाहीत आणि सलत तर राहतात. रात्री ऊस तोडणे म्हणजे नरकातल्या शिक्षेपेक्षा ही भयंकर शिक्षा. मग कधी कधी रात्रभर काम करावे लागेत. आणि वेळ आलीच तर सलग रात्र आणि दिवस हे करावे लागते



मग काहीही झाले तरी चालेल. दुखत असले तरी मुकादम तुमचं ऐकुन घेत नाही. कारण त्याने पैसे मोजलेले असतात.

जर ऊस तोडताना पाऊस सुरु झाला तर मग विचारायचीच सोय नाही. कारण झोपडी असली तरीही जमीनीत पाणी गेल्यावर झोपण्याची सुध्धा पंचाईत होते. मग संसार वाचवायचा का मुलांना बघायची हाच मुळ प्रश्न असतो त्यांच्या समोर.

ज्यांची नविन लग्न झालेली असतात त्यांना कसली प्रायव्हसी आणि कसलं काय? आपल्याकडे मात्र प्रायव्हसी नाही ह्या नावाखाले घटस्फ़ोटाचे वाढते प्रमाण दिसते. बरं इथपर्यंत ठिक आहे. काही बायका मी अश्या पाहील्या आहेत ज्या गरोदर आहेत आणि तरीही त्या मोळी उचलण्याच काम करतात. आणि काही बायका अशाही आहेत ज्यांची बाळंतपणे तिथेच म्हणजे शेतात होतात. नशीब त्या वेळेस तरी त्या बाईला घरी जाण्याची परवानगी असते. अशा अवस्थेत त्यांना पाहीले की काळजात चर्रर्र.. होते. ह्या मुळे आपल्या देशाचे बाल मृत्यु दर वाढत आहे. तसेच मुलांचे कुपोषणाचे सुध्धा प्रश्न निर्माण होत आहेत.

ह्यांच्या मुलांच्या शाळा तर कधीच सुटलेल्या असतात. कारण सारखं फिरतीवर रहावं लागतं आणि पूर्ण परीवार ऊसतोडीला आल्यामुळे त्यांना कुठे ठेवायची हाही एक प्रश्न असतो. ह्या एकाच प्रश्नामुळे त्याची शाळा कायमची तुटते. त्यामुळे ते अडाणी ते अडाणीच राहतात.

तब्बल ६ ते ८ महीने ते गावाच्या बाहेर राहतात कोणी कर्नाटकात तर कोणी गुजराथ मधे.



ऊसाच्या टोळीवाल्यांचा मालक फक्त मुकादम असतो तो म्हणेल तसेच वागावे लागते तो म्हणेल तेच काम करावे लागते. बरं सगळे कष्ट करुन पदरात ह्यांच्या काहीच उरत नाही. कारण सगळा पैसा परत एक तर सावकाराच्या घशात किंवा दारुमधे निघुन जातो. परत गावाकडे आल्यावर जैसे थे.

ह्या दरम्यान गावाकडे सगळे व्यवहार थंड झालेले असतात. कारण गावाकडची निम्मी अर्धी सगळी कारखान्याला गेलेली असतात. शेतकऱ्यांना मजुर मिळत नाहीत कारण पैश्याच्या लालचीने सगळे मजुर तिकडेच वळालेली असतात.


वर्षानुवर्षे हेच चालु आहे. कधी बदलणार आहे ही स्थिती......

हा प्रश्न तसाच आहे......



www.esahity.com


# स्वगत
# एका मध्यमवर्गीय गार्गीचे




विनिता श्रीकांत देशपांडे

मी गार्गी, माझ्या संसाराची चौकट चार चौघांसारखीच, नवरा विजय, मुलगा अक्षय आणि मुलगी अनया. या संसारातच माझं विश्व, समाधान आणि आनंद..........पण एक असाही क्षण माझ्या आयुष्यात येईल असं कधीच वाटलं नव्हतं.....

" माझी आजची संध्याकाळ रोज सारखीच होती. तसं संध्याकाळी घरी एकटं रहायचा खूप कंटाळा आला होता. पण करणार तरी काय ?





साहित्य प्रतिष्ठान®

जो तो आपआपल्या विश्वात रमलेला. मुलं ..कॉलेज, क्लास आणि मग मित्र-मैत्रीणीं -ते रात्रीच परत यायचे, आल्यावर ते आणि त्यांच कंप्युटर, नाही तर मोबाइलवर गप्पा. यामधून ते वेळ काढून माझी विचारपूस करत मग आमच्या थोड्याशा गप्पा. गप्पा म्हणजे आजचा मेनू आणि नवीन फरमाइश..आणि आमचे अहो अर्थात श्री.विजयराव...त्यांचा आनंद तर मुलांना गणित शिकवण्यात.... वर्गातल्या मुलांच्या आठवडी परिक्षाचे पेपर काढणे..नंतर ते तपासणे.. यातच आठवडा कसा जायचा कळायचा नाही. आधी संसाराला हातभार, मुलांच्या शिक्षणासाठी म्हणून नोकरी सांभाळत यांनी क्लासेस सुरु केले. नंतर नंतर ती सवयच होऊन गेली. आज कित्येक वर्षांनी मी स्वत:बद्दल विचार करत होते. माझं मलाच आश्चर्य वाटलं. कित्येक वर्षांपासून माझी संध्याकाळ एकटीच होती. खरंतर हे एकटेपण मला हळुहळु आवडायला लागलं होत. काही वर्ष टि.व्ही. ने सोबत केली नंतर भटकंती ने. भटकंतीचा पण कंटाळा आला होता. कंटाळा नाही..म्हणता येणार पण येता जाता ते ओळखीच्यांचं भेटणं...तेच प्रश्न तेच उत्तर याचा विलक्षण कंटाळा आला होता. एकाकीपणाच्या वलयात मी अनाहूतपणे गुंतली आणि मला ही गुंतायला आवडलं. खरंतर खूप मैत्रीणी...गप्पा...मी यात कधी गुंतलेच नव्हते. कॉलेज मधली मैत्री.. कॉलेज संपलं आणि मैत्रीही, माझी मैत्री होती पुस्तकांशी. त्या वाचनात मी इतके दंग होत असे की मीही त्यातलीच एक पात्र होउन जात असे आणि आई-बाबा नेहमीच या व्यासंगाला माझे व्यसन म्हणत. हे व्यसन मी लग्नानंतरही जपले होते. स्मृतींची पाने चाळता चाळता इंदिरा संत यांची "मध्यमवर्गी गार्गी" कविता उगीच आठवून गेली.

एक दगड कष्टाचा

एक दगड काळाचा

एक दगड त्यागाचा

वात्सल्याचा थर घाटासाठी वापरायचा

अशी सुरेख चूल घरोघरी असलेली

घर सांभाळणारी ...घर जोपासणारी

तिचेच नाव गृहस्वामिनी. गृहलक्ष्मी

घरधनीण.अशी गृहघराने वेढलेली.जखडलेली

घरभर घुमणारी भोवऱ्यासारखी

दंग आणि अतृप्त............................

आणि मग कुकर, मग पोळया, मग फोडण्या

थोरापोरांच्या मनधरण्या. नोकरांच्या काचण्या

कितीतरी धागे घट्ट जखडून ठेवणारे

सगळाच शिणवटा. शिजवणारी तीच

आणि शिजणारीही तीच.

आज माझी नेमकी हीच अवस्था होती. इतक्या वर्षांचा शिणवटा.....कसा अन कुठे काढू ? या विचारात मी गॅस बंद करुन गच्चीवर आले तोच तिथे बसलेली चिमणी उडून गेली, आणि आवडीचं जुनं पुस्तक हाती लागावं तसे जुन्या आठवणी पानं पलटत आल्या.......कधी काळी मला कविता खूप आवडायच्या...कितीतरी कविता मी टिपून ठेवल्या होत्या....त्यावर आई-बाबांशी, मैत्रीणींशी चर्चा कधी कधी वाद सुध्दा.... आवडीच्या कविता  गुणगुणत अभ्यास, सगळी कामं सर्व त्याच ठेक्यावर....मग हे सारं केव्हा अन कुठल्या वळणावर  हरवून गेलं माझं मलाच कळलं नाही.

" आई  ए आई . ..काय झालं बंर नाही वाटत का? अक्षय

अरे! एवढ्या लवकर आलास? मी

" अग ! सर गावाला गेलेत..कोणी नात्यातलं गेलं, म्हणुन मग काय सुट्टी...

निलु, अमेय म्हणे की सिनेमाला जाऊ पण तिकिटं नाही मिळाले म्हणून सरळ घरी आलो...जाम कंटाळा आला बघ....मस्त शिरा कर, मी टि.व्ही.बघणार खूप दिवस झाले......."अक्षय.

आठवणी झटकून मी कामाला लागले...आजचा दिवस आला आणि गेला.

"चल अनया .. आटप लवकर.. अक्षय उशीर होइल रे..

"चल गार्गी..निघालो..मी. आज बहूतेक यायला उशीर होईल, वाट नको पाहू.." विजयराव

म्हणे वाट नको पाहू..असं कसं शक्य आहे मी दुसरं करणार तरी काय..मीच पुटपुटले

"बा..य बाय आई..." अक्षय.अनया. बाय

" चला परत मी आणि माझ एकटेपण ".

झाडांना पाणी टाकतांना गच्चीत कालचीच चिमणी दिसली.

मात्र आज ती उडाली नाही, जणु ओळख असावी त्या ऐटीत बसली होती.

आठवणींचं मळभ परत दाटून आलं. चिमणी अजूनही तिथेच बसली होती.

अनेक विचारांचे तरंग मनाच्या तळयात उठले. विचित्र मनस्थितीत मी गुंतत गेले, विचारांचा हा गुंता सोडवायचा होता. यात दंग असतांना माझे मन कधी पक्षी होउन गेलं कळलेच नाही.

काही केल्या, काही केल्या

निळा पक्षी जात नाही

प्रकाशाचे पंख सान

निळी चोच, निळी मान

निळे डोळे, निळे गान

निळी चाल, निळा ढंग

त्याने चढे आकाशाला

निळा रंग.

विचारांना झटकण्याचा प्रयत्न विन्दांसारखा मी पण करुन पाहिला पण तो निष्फळ ठरला. हा पक्षी जणु माझ्या अंतर्मनातील द्वंद्वाचे प्रतीकच.,जो विचार बुद्धी झटकून टाकण्याचा प्रयत्न करते.. मन त्याचा तेवढाच विचार करायला लावते. माझे आयुष्य इतरांसारखेच.. माहेर चार चौघींसारख..शिक्षण दोघीतिघीं सारख..संसाराची हौस माझी...नवरा माझ्या आवडीचा..मुलांची गरज माझी...तडजोड माझ्या स्वखुशीची...

घर माझ्या आवडीचं...घरातली प्रत्येक वस्तु माझ्या आवडीची...हौस मौज माझी....तरी पण या सर्वात एक धागा सापडत न्हवता. यासर्वात मी असले ..तरी...कुठेतरी "मी "पण..हरवले होते .....

या विचारात आजचा दिवस कसा निघून गेला कळलंच नाही....

रात्री माझा अलिप्तपणा सर्वांनाच जाणवला.

" काय गार्गी तब्येत ठीक आहे  ना ? " विजयराव

"ए आई,तू एवढी शांत का आहेस ?"अनया

"हं काय झाल गं आई" अक्षय

या प्रश्नांनी मी तात्पुरती भानावर आले..पण विचारांचा दंगा काही संपत न्हवता.

" प्लीज़ आई तू अशी उदास नको ना राहू अख्खं घर उदास वाटत ग ". अनया

"अरे , असं काही झालं नाही मला " मी भानावर येत म्हणाले.

हा पण दिवस आला आणि गेला.

पुन्हा तोच निळा पक्षी आला. आता मी एकटेपणाची आणि त्या चिमणीची वाट पाहू लागले.

आज या विचारांची गर्तता गहन होती.

"असली ही जात न्यारी,

बसे माझ्या निंबावरी;

पृथ्वीमध्ये पाळे खोल;

तरी सुध्दा जाई तोल....

अनंताचा खड्डा खोल"

विचारांच्या खोल गर्ततेत हा अनुभव प्रत्येकाच मन घेत असेलं, विन्दांना या ओळीतून नेमक काय सुचवाच होतं? मनावरचा ताबा आधी ढळतो, की विचारांवरचा?

इतके वर्ष मी काय केलं ? घर आणि घरपण जपण्यातच गुंग होते. तोच माझा छंद...तोच माझा नाद. पण मला आयुष्यात एवढंच साधायचं होतं? याच इच्छा याच आकांक्षा होत्या? घरातलं, घरच्यांच समाधान मी साधलं होतं पण माझं ..? माझं समाधान यातच होतं तर एवढ सगळं साधून मला कशाची हुरहुर लागली आहे ?

एवढे प्रश्न स्वत:ला विचारुन माझा मन आणि विचार या दोघांवरचा सयंम सुटला होता.

" मी सर्वसामान्य..माझं आयुष्य सर्वसामान्य...सारं काही सुरळीत चालू असतांना मन अस्थिर का? हा धागा काही केल्या सापडत न्हवता. मी या वर जेवढा विचार करायची तेवढी अस्वस्थता वाढत होती."

तर्काच्या या गोफणीने, फेकितसे काही जड ;

आणि पाने आघाताने करतात तडफड;

टिकाळीला निळा पक्षी, जसा धड तसा धड

... ...उंच जागा अवघड.

विन्दांप्रमाणेच माझी विचार शक्ती आज मनाच्या अधीन झाली होती. कसली ही तगमग, अतृप्ततेची बोच का म्हणून मला छळत होती काहीच कळत नव्हते. खरंच ही जागा उंच आणि अवघड होती. अंतर्मनाचा आवाज बुध्दीपर्यंत पोहचवण्याचा माझा मीच प्रयत्न करायलाच हवा. माझ्या या विचारांवर तर्काच्या गोफणीने वार करायलाच हवा. मी या द्विधा मनस्थितीतून बाहेर पडायलाच हवे.

याचे गान याचे गान,अमृताची जणू सुई

पांघरुण घेतो जाड,तरी टोचे,झोप नाही

जागविते मेलेल्याला ,जागृतांना करे घाई

याचे गान याचे गान,स्वरालाच तुरे भान

नाही तार नाही मंद्र ,चोची मधे धरी चंद्र

काही केल्या निळा पक्षी जात नाही

या मनस्थितीत, या परिस्थितीत मला गोफणी ने नेम साधता येईल का ? पण प्रयत्न तर करायलाच हवा. गच्चीवर निळा पक्षी परत आला, म्हणाला "खूप झाले घर माझे घर.. जरा घराबाहेर डोकावुन बघ..माझ्यासोबत उडून बघ..या अवजड विचारांना झटकून टाक...बघ जरा जगाची वाटचाल कुठल्या दिशेला आहे. बघ तुझ्या सारख्या कित्येक गार्गी याच विळख्यात अडकल्या आहेत...त्यांना हा निळा रंग देउन बघ..

आजचा हा क्षण आला आणि खूप काही देउन गेला. आजचा दिवसही निळा, रात्रही निळीच होती. मला कितीतरी नवीन कविता शोधून टिपून घ्यायच्या होत्या...नवीन पुस्तकं वाचायची होती...शेजारच्या मंगलाकाकूंसोबत अनाथआश्रमात जायचे होते...शारदावहिनींच्या महिला मंडळाची सदस्य व्हायच होतं.. अनयाच्या रुखवताची सुरवात करायची होती........एखाद नवं नाटक यांच्या सोबत बघायचं होतं....

काही केल्या काही केल्या

निळा पक्षी जात नाही.

प्रकाशाचे पंख सान

निळी चोच, निळी मान

निळे डोळे, निळे गान


निळी चाल, निळा ढंग

त्याने चढे आकाशाला

निळा रंग.

# यांच्यासाठी कोणती पॉलिसी आहे ??

नेत्रा कुलकर्णी



"New Bima Gold.."

"अच्छा, काय plan आहे?"

मी तीन-चार दिवसांची सुट्टी घेऊन घरी गेले होते. बरीच महत्वाची कामं उरकायची होती. हे काही त्यापैकी एक काम नक्कीच नव्हतं. पण मागच्या वेळी आमची LIC ची कामे पाहणाऱ्या आणि माझ्या बाबांचे चांगले मित्र असणाऱ्या काकांना मी सांगून ठेवलं होतं की पुढच्या वेळेस मी तुम्हाला पॉलिसीच्या बाबतीत नक्कीच भेटेन. या वेळी त्यांनी, मी केव्हा येणार हे माझ्या आईकडून विचारून घेऊन स्वतःच भेटण्याची वेळ नक्की केली होती.. " काका, मला ULIP नको आहे हं. माझी already investment झाली आहे. आणि थोडा कमी premium असेल तरच सांगा." मी थोडा त्रासिक चेहरा करून बोलले. मला पुढचे खर्च डोळ्यासमोर दिसत होते. " अगं हो, माहिती आहे मला. हा money back plan आहे. तू बारा, सोळा किंवा वीस वर्षांची term घेऊ शकतेस. Term संपल्यानंतर, term च्या अर्धी वर्षे तुला 'extra insurance cover' मिळेल, premium न भरताही !

शिवाय दर चार वर्षांनंतर sum assured च्या पंधरा टक्के रक्कम तुला मिळत जाईल. त्यातूनच तू नंतरचे premium भरू शकतेस. आणि या पॉलिसीच्या against, home loan पण मिळून जाईल. म्हणजे समजा, उद्या तुला किंवा तुझ्या नवऱ्याला तशीच गरज पडली तर काही problem नाही.." शेवटचे वाक्य काका हसत बोलले. माझ्या न माहिती असलेल्या नवऱ्याचीही काळजी त्यांना होती. Insurance agents ना त्यांच्या clients ची कोणती कोणती काळजी करावी लागते आणि त्यानुसार माहिती ठेवावी लागते याचं आश्चर्य वाटण्याची काहीच गरज नाही.. :)

" आणि समजा, त्याच नवऱ्याने लग्नाअगोदर माझा bank balance विचारला तर त्याला काय सांगू ? Zero? अहो काका, मला अजूनही बरेच खर्च आहेत.." मला माहिती होतं, काका ही पॉलिसी माझ्या गळयात मारणार पण तरीही मी थोडे आढेवेढे घेण्याचा फुटकळ प्रयत्न केला.

" तुला कसले आलेत एवढे खर्च? तुझा बाबा आहे की, उगाच काहीही नको सांगू.."

" तुमच्याचकडे काढलेल्या दोन पॉलिसींचे premiums भरायचे आहेत next month मधे. एकदम.. थोडे mutual fund मध्ये पण जमा करायचे आहेत..आणि अजून माझी salary काही taxable नाही आहे." माझ्या salary चे details त्यांनी विचारण्याअगोदर मीच त्यांना थोडाफार अंदाज दिला. म्हणजे नंतर exact salary amount सांगण्याची गरज नाही. ;)

" अगं भरशिल गं. तेवढीच investment होईल."

" बर. Benefit काय तो सांगा. Death नको, maturity benefit सांगा. कारण तसंही insurance coverage खूप घेतलेलं आहे मी." मी हसत बोलले. आता माझा नाईलाज होता.

" जसं मी तुला अगोदर सांगितलं, प्रत्येक चार वर्षांनंतर sum assured च्या पंधरा टक्के रक्कम मिळत जाईल. Maturity ला Paid premium plus loyalty bonus. अगोदर मिळालेली रक्कम वजा होईल हं पण.." दुसरा कोणी Insurance agent असता तर त्याने ही पूर्ण माहिती अगोदर सांगितलीच असती असं नाही. म्हणजे अगोदर मिळालेली रक्कम वजा होईल वगैरे.. पण हे काका आमचे पिढ्यान् पिढ्यांचा सोनार असावा तसे बऱ्याच वर्षांचे Insurance agent होते. आणि नंतर, मला अगोदर का नाही सांगितलं असं मी त्यांना विचारू शकते हे त्यांनाही माहिती होतं..

शेवटी मी त्यांना policy term सांगून Age, ID, Address Proof, cheque वगैरे गोष्टी देऊन documents sign केले. आणि सुस्कारा सोडला. नोकरीला लागल्यापासून ही तिसरी पॉलिसी काकांनी मला दिली होती (मी घेतली नव्हती..). चला, हा पण premium आता दर वर्षी चालू झाला..

काका गेल्यानंतर जेवणे वगैरे आटोपून मी आणि माझी आई shopping साठी बाहेर पडलो. मी गाडी चालवत होते. डोक्यात हजार विचार चालू झाले. Extended coverage, premium.. खर्च, खर्च आणि फक्त खर्च. माझ्या खोलीचं भाडं, महिन्याचा पेट्रोल खर्च, मेस, mutual fund, shopping आणि त्यातच हे insurance premium.. कसं काय manage होणार आहे देव जाणे..

" तो बघ, डोंबाऱ्यांचा खेळ.." माझी आई जवळ जवळ पाठीमागून ओरडलीच. मी पटकन गाडी बाजूला थांबवली आणि तो खेळ पाहू लागले.

" व्हय व्हय गं माज्ये बाये, अगं अगंS अगंSS...आहा आहाSS..." गर्दीच्या मध्ये एक माणूस ढोलकी वाजवता वाजवता ओरडत होता. त्या ढोलकीचा घुंई घुंई असा आवाज येत होता. चार बांबू दोन बाजूंना उभे केले होते. त्यांना जमिनीपासून अंदाजे बारा-पंधरा फूटांवर जाडसर दोरखंड बांधला होता. त्या दोरखंडावरून एक सात-आठ वर्षांची मुलगी तोल सांभाळत हातात काठी घेऊन चालत होती. तिथेच बाजूला अंदाजे सहा वर्षांचा मुलगा कोलांट्या उड्या मारत होता. एक बाई लोकांकडून पैसे गोळा करत होती. तिच्या पाठीवर एका झोळीमध्ये छोटे बाळ झोपले होते.

" शाब्बास गं माज्ये रानीSS .., आहा आहा.." गर्दी वाढत असलेली पाहून ढोलकीवाल्या माणसाचा उत्साह वाढत होता. तो त्याचा उत्साह ढोलकीतून आणि त्याच्या आवाजातून व्यक्त होत होता. ती मुलगीही अगदी लक्षपूर्वक तोल सांभाळत दोरखंडावरून चालत होती. खेळ अगदी रंगात आला होता. मला त्या मुलीचे खूप कौतूक वाटत होते. Waah, what a concentration!! ती बाई माझ्याजवळ पैशांच्या आशेने आली. मी पटकन तिला पैसे दिले. मनात विचार आला, भिकाऱ्यांना पैसे देण्यापेक्षा यांना दिलेले काय वाईट?

"अगं अगं रानीSS.., शाब्बास शाब्बास..." पैसे मिळत असलेले पाहून त्या सर्वांनाच जोर येत होता. ते वेगवेगळे खेळ करून लोकांचे मनोरंजन करत होते. "व्वा व्वा गं माज्ये पोरी, माज्ये रानी..आहा आहा..." घुंई घुंई आवाज वाढत होता..

आम्ही घाईत असल्यामुळे फार वेळ तेथे न काढता लगेच निघालो. या लोकांचं बरं असतं. खेळ करा, पैसे कमवा, त्यातूनच जे काही मिळेल ते खा. डोक्याला कोणताही त्रास नाही, office ची घाई नाही, investment नाही, premium नाही, काही नाही.. पण एक मिनिट, what about the security of their life? त्याचं जीवन आपल्या जीवनापेक्षा जास्त धोकादायक नाही का? त्या कुटुंबाचं काय होईल जर त्या मुलीला खेळ करता करताच काही दुखापत झाली? Hospital चा खर्च तरी ते करू शकतील की नाही कोण जाणे?

माझ्याकडे गरजेपेक्षाही जास्त insurance coverage होतं. माझ्यासारख्या कितीतरी लोकांकडे ते असणार यात शंकाच नाही. पहिली पॉलिसी घेताना काकांनी मला emotional blackmail केलं होतं, "Death is certain, but the time is uncertain.." हीच गोष्ट या लोकांना देखील लागू होत नाही का? असे खेळ करताना त्यांच्या आयुष्याची जास्त risk ते घेत नाहीत का? सध्या ज्या काही २५-२७ life insurance आणि general insurance companies भारतामध्ये काम करत आहेत, त्यांच्याकडे खुपसे निरनिराळे plans, निरनिराळ्या customers साठी आहेत. शिवाय group insurance, mediclaim policies या गोष्टीही आहेत. पण 'या' लोकांसाठी कोणत्या insurance company कडे काही 'Plans' आहेत का? यांच्या security चे काय? आणि मुळात ज्यांच्याकडे Age, ID, Address proof नाही त्यांच्यासाठी कोणते Plans असणार म्हणा.. ज्यांना दोन वेळच्या खाण्या-पिण्याची भ्रांत त्यांना काय Insurance चं महत्व? After all, 'INSURANCE IS THE SUBJECT MATTER OF SOLICITATION'. Though it doesn't happen in real life, who will make them to buy??



# श्री विजय पांढरे यांचे इंजिनियर्सना खुले पत्र



*जलसंपदा खात्यातील भ्रष्टाचाराला वाचा फोडणारे 'मेटा' (महाराष्ट्र इंजिनिअरिंग ट्रेनिंग ॲकॅडमी) तील मुख्य अभियंता विजय पांढरे यांच्याविरोधात या भ्रष्टाचारात हितसंबंध गुंतलेल्यांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. अनावश्यक व चुकीच्या पद्धतीने अंदाजपत्रक फुगवून जलसंपदा प्रकल्पांत जनतेचा पैसा अनाठायी खर्च होत असल्याकडे पांढरे यांनी राज्यपाल, मुख्यमंत्री, मुख्य सचिव व जलसंपदा खात्याचे प्रधान सचिव यांचे पत्राद्वारे लक्ष वेधले होते. ही पत्रे प्रसिद्धी माध्यमांकडून जनतेसमोर आल्यानंतर पांढरे यांची कोंडी करण्याचे प्रयत्न सुरू असून अभियंता महासंघाने तर खास बैठक बोलावून या पत्रफुटीबद्दल नाराजीचा सूर मांडला आहे. या पार्श्वभूमीवर पांढरे यांनी सर्व अभियंत्यांना एक खुले पत्र लिहिले आहे. त्या पत्राचा हा गोषवारा :*

माझ्या अभियंता मित्रांनो,

आज आपण सर्व अत्यंत वाईट परिस्थितीतून जात आहोत. आपल्या खात्याविषयी मीडियामध्ये प्रचंड ओरड झाली आहे. मीडियामध्ये माझी पत्रे कशी फुटली, कुठून फुटली मला काहीही माहीत नाही. पत्र फुटण्याशी माझा तिळमात्र संबंध नाही. मी फक्त मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मुख्य सचिव व प्रधान सचिव (जलसंपदा) या चौघांना पत्र देऊन जो जनतेचा पैसा अनाठायी, अनावश्यक, चुकीच्या पद्धतीने, दर वाढवून, अंदाजपत्रक वाढवून उगाच हजारो कोटींची अनावश्यक अंदाजपत्रके बनवून वाया घालवला जात आहे, तो जनतेचा पैसा वाया जाणे थांबवावे अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे आणि तुम्हालाही माझ्यासारखे वाटते अशी माझी खात्री आहे. अशी पत्रे देण्याची वेळ का आली याची पार्श्वभूमी तुमच्या समोर मांडण्याची माझी इच्छा आहे. त्यासाठी मी माझी बाजू आपल्यासमोर स्पष्टपणे व विस्ताराने मांडत आहे.

सुमारे एक वर्षाआधी माझी मुख्य अभियंता पदावर पदोन्नती झाली व मुख्य अभियंता (संकल्पन, प्रशिक्षण, संशोधन, सुरक्षितता) या पदांवर माझी शासनाने नियुक्ती केली. वरील चार विषयांव्यतिरिक्त जलसंपदा खात्याचे संपूर्ण राज्याचे दक्षता पथक व गुणनियंत्रणदेखील माझ्या अखत्यारित होते. तसेच राज्याच्या तांत्रिक सल्लागार समितीचा मी सदस्य आहे. हे सगळे काम करताना मला आलेले अनुभव फारसे चांगले नाहीत. राज्य तांत्रिक सल्लागार समितीचा सदस्य म्हणून जलसंपदा खात्यातली अंदाजपत्रके माझ्याकडे तपासण्यासाठी आली. अंदाजपत्रकात अनेक गंभीर चुका होत्या, चुकीच्या पद्धती वापरल्या गेल्या होत्या, अत्यंत महागडे व अव्यवहार्य असे प्रकल्पही सुचविले होते तसेच सर्व अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव आणून उगाच अंदाजपत्रकांचा खर्च वाढवून ती अवाढव्य केली जात असल्याचे मला आढळले.

थेट मंत्रालयातून दूरध्वनी येतात. अनेकदा तर असे झाले की अंदाजपत्रक आपल्या कार्यालयात पोहोचले नसतानाच, 'ते लवकर पाठवा घाई आहे', असा दूरध्वनी येतो! खात्यातील सर्व अधिकारी दबावाखाली काम करीत आहेत. ठेकेदार पुढाऱ्यांमार्फत प्रचंड दबाव टाकून घाईत अंदाजपत्रके मंजूर करून घेतात. जे अधिकारी विरोध करतील त्यांच्या बदल्या होतात. त्यांना एका कोपऱ्यात कायमचे बसवून ठेवले जाते. हा खात्याचा शिरस्ता आहे. सुरुवातीला तर मला अंदाजपत्रके दाखविलीही जायची नाहीत. मग मी महासंचालकांना विनंती केली की, कृपया अंदाजपत्रक तपासणीसाठी आठ/दहा दिवस द्यावेत. त्यावर ते म्हणाले की, तुम्ही डिझाईनचे मुख्य अभियंता असल्याने अंदाजपत्रकातील डिझाईन सीडीओमार्फत झाले आहे की नाही, तेवढेच तपासा बाकीच्या बाबी इतर अभियंते पाहातील. मी त्यांना जोरदार विरोध केला व तुमचे म्हणणे लेखी कळवा तरच ते मी मान्य करेन, असे सांगितले. त्यांनी आधी आढेवेढे घेतले पण अन्य एका सहकाऱ्याने मला पाठिंबा दिल्यावर व मी ठाम राहिल्यावर माझ्याकडे संपूर्ण अंदाजपत्रके तपासणीला यायला लागली. त्या तपासणीत बऱ्याच अंदाजपत्रकात मला खूप गंभीर उणिवा आढळल्या. कारण नसताना काम वाढवल्याची वृत्ती सर्व अंदाजपत्रकात दिसली. प्रत्येक प्रशासकीय मान्यतेच्या वेळी नव्या नव्या बाबी अंतर्भूत केल्याचे आढळले व मारुतीच्या शेपटीसारखे प्रकल्पाचे काम कधीच संपणार नाही अशी तजवीज केल्याचे आढळत होते. म्हणूनच बरेच प्रकल्प १५/२० वर्षे सुरू असूनही पूर्ण होत नाहीत. किमती कित्येक पटीने वाढतात आणि अजून नव्या बाबी अंदाजपत्रकात टाकतात आणि प्रकल्पाचे काम २०/२५ वर्षे सुरूच ठेवतात. यात नुसता खर्च जास्त होतो त्यांचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा तसा होत नाही. शेकडो कोटी खर्च होतात, पण प्रकल्प काही पूर्ण होत नाहीत.

एकदा कोकणातील एका अंदाजपत्रकातील अनेक गंभीर त्रुटी मी निदर्शनास आणल्या असता, महासंचालकांनी मला त्या न नोंदवण्याच्या सूचना दिल्या व सांगितले की तुम्ही त्रुटी काढल्या तरी त्या कागदावर मी सही करणार नाही. हे

अंदाजपत्रक पुढे पाठविण्याबाबत दबाव आहे व आपल्याला पुढे त्वरित पाठवावयाचे आहे. त्यावर मी त्यांना स्पष्ट सांगितले की तुम्ही जर इतक्या गंभीर उणिवांकडे दुर्लक्ष करणार असाल तर मी प्रधान सचिवांना मंत्रालयात तसे लेखी पत्र देईल. यावर त्यांनी म्हटले की, तुम्हाला काय करायचे ते करा, पण माझ्यामार्फत मी तसे पत्र देणार नाही. म्हणून मी जलसंपदा खात्याच्या प्रधान सचिवांना त्या प्रकल्पाच्या गंभीर त्रुटीसंबंधी लेखी पत्र दिले व योग्य अंदाजपत्रक न बनवल्याबद्दल सदर अंदाजपत्रकाची सखोल तपासणी करून सर्व संबंधितांची चौकशी करण्याची मागणी केली. प्रधान सचिवांनीही त्यात फारसे लक्ष घातले नाही. उलट मला सांगितले की, अंदाजपत्रके कोकणातील आहेत, त्यात तुम्ही जास्त लक्ष घालू नका. हे ऐकून मी अवाकच झालो. सर्वच अभियंते मला ठेकेदार व पुढाऱ्यांपुढे हतबल झालेले दिसले. खुद्द सचिव आणि खात्याचे सर्व अधिकारी अभियंता हतबल पाहून मला फार वाईट वाटले. आणि मी ही परिस्थिती बदलण्यासाठी राज्यपाल व मुख्यमंत्र्यांना पत्र देण्याचा निर्णय घेतला. राज्यातील सर्वच महामंडळांच्या सर्व अंदापत्रकांची सखोल तांत्रिक चौकशीची मागणी मी त्यांच्याकडे केली. कोणत्याही द्वेषापोटी ही पत्रे दिलेली नाहीत तर धरणांची गुणवत्ता सुधारावी, हा हेतू होता.

जलसंपदा खात्यात गुणवत्तेचे नाटक केले जाते. म्हणूनच गोसीखुर्द डाव्या कालव्याच्या संपूर्ण २३ कि.मी. लाईनिंगला त्यात पाणी सोडण्याआधी पहिल्याच वर्षी तडे जातात. या कामाच्या मेंढेगिरी चौकशी समितीचा मी पण सदस्य होतो. समितीने हे काम अत्यंत निकृष्ट झाल्याचा अहवाल देऊनही एकाही अभियंत्यावर कारवाई झाली नाही. काहीही केले तरी चालते, पुढारी/ठेकेदार आपल्याला वाचवतात, हाच संदेश यातून गेला. त्यामुळे उशीरा का होईना, अशा निकृष्ट प्रकल्पांतील दोषींवर कारवाई करा, अशी माझी विनंती आहे. २००१ साली मी गुणवत्ता नियंत्रण विभागात, कार्यकारी अभियंता पदावर धुळे येथे कार्यरत असताना निम्न तापी धरणाचे निकृष्ट बांधकाम असल्याचा ६०० पानांचा अहवाल शासनाला पाठविला. पण थातूरमातूर चौकशी करून प्रकरण दाबून टाकले गेले. तापीवरचे धरण फुटले तर

किती भयानक हाहाकार होईल याची कल्पना केलेली बरी. या धरणाच्या खाली तापी नदीवर ३ मोठी धरणे आहेत. निम्न तापीचे धरण फुटले तर ही तिन्हीही खालची धरणे ठिकाणावर तरी राहतील काय? मग नदीच्या काठावरची २५/३० खेडी वाहून जाणार नाहीत का? हजारो लोकांचे जीव गेले तर त्याला कोण जबाबदार? पण जलसंपदा खात्याला त्याचे सोयरसुतक नाही. सचिवच बोगस कामांना संरक्षण देताना आढळले आहेत. नंतर त्या कामांचे गुणनियंत्रण माझ्या धुळे गुणनियंत्रण विभागाकडून काढून घेऊन ४०० कि.मी. अंतरावरील अमरावती विभागाला देण्यात आले! आता अलीकडचा अनुभव सांगतो. मी २/३ महिन्यांपूर्वी पुणे विभागातील तारळी प्रकल्पाला भेट देण्यासाठी गेलो होतो. या धरणाची उंची ९० मीटर आहे. म्हणजे कोयना धरणाच्या उंचीइतके हे धरण आहे. या धरणाची पाहणी करीत असताना मी संबंधित कार्यकारी अभियंत्याला कोलग्राऊट कोअरचे रजिस्टर मागितले असता मला रजिस्टर दाखविण्यात आले नाही. राज्याच्या गुणनियंत्रण विभागाच्या मुख्य अभियंत्याला हे लोक जुमानत नाहीत, हे लक्षात आले. मग नाशिकला आल्यावर तारळी प्रकल्पाच्या गुणनियंत्रणाचा सखोल अभ्यास केला असता असे आढळले की तारळी प्रकल्पाचे एकूण ६६ मोठे कोअर (३ फूट व्यास, ३ फूट उंची व वजन सुमारे २५०० किलो) काढले असून त्यांच्या काँप्रेसिव्ह स्ट्रेंग्थचा अभ्यास केला असता अत्यंत भयानक चित्र समोर आले. टेंडरनुसार या बांधकामाची काँप्रेसिव्ह स्ट्रेंग्थ ११७ के.जी. दर चौ.सें.मी. पाहिजे. पण सर्व ६६ कोअरची काँप्रेसिव्ह स्ट्रेंग्थ खूपच कमी असल्याचे आढळले. अनेक कोअरची काँप्रेसिव्ह स्ट्रेंग्थ ४० के.जी दर चौ.सें.मी./ ४५ के.जी.दर चौ. सें.मी./ ५० के.जी. दर चौ.सें.मी. आढळली आहे. याचाच अर्थ एकंदर तारळी प्रकल्पाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट आहे.

या ६६ कोअरची काँप्रेसिव्ह स्ट्रेंग्थ टेंडरप्रमाणे १०० टक्के येणेऐवजी ५८ टक्के आली आहे. धरणाच्या कामात ४/६ टक्केचा फरकही अत्यंत गांभीर्याने घेतला जातो. मग ४२ टक्के कमी गुणवत्तेचे हे बांधकाम निकृष्टात निकृष्ट आहे यात शंका नाही. आम्हा अभियंत्यांना हे माहीत आहे की जितके टक्के सिमेंट कमी वापरले जाते तितके टक्के

ताकद कमी भरते. मग आता ४२ टक्के सिमेंट कमी वापरले काय, अशी शंका निर्माण झाली आहे. या कामाच्या सिमेंट वापराची टेंडरशर्तीनुसार डिलिव्हरी चलन व फॅक्टरी गेटपास तपासून किती सिमेंट वापरले गेले यांची खात्री करणे आवश्यक आहे. फक्त जलसंपदा खात्याच्या प्रधान सचिवांना लिहिले तर हे प्रकरणही थातूरमातूर चौकशीनंतर दडपले जाण्याचीच शक्यता मोठी आहे. म्हणून राज्यपाल व मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिण्याची वेळ आली. तारळी प्रकल्पात कोल ग्राऊट बांधकामासाठी ८२ लक्ष सिमेंट बॅग वापरल्या गेल्या आहेत. याच्या ४२ टक्के म्हणजे ३२ लक्ष सिमेंट बॅग कमी वापरल्याची शंका निर्माण झाली आहे. याची चौकशी त्वरित सीबीआयमार्फत व्हायला पाहिजे. कारण आमचे बोगस चौकशी अधिकारी बोगस चौकशी करून शासनाला ओके रिपोर्ट देतात, असाच लोअर तापीचा माझा अनुभव आहे.

तुम्हाला सांगावयास हरकत नाही की, ज्या दिवशी तापी महामंडळाचे उद्घाटन झाले त्या दिवशी रात्री १० वाजता त्या वेळेचे सचिव आर. जी. कुलकर्णी यांनी घेतलेल्या बैठकीला २५/३० कार्यकारी अभियंता उपस्थित होते. त्या बैठकीत मी उठून सचिवांना विनंती केली की आपली एक चूक होत आहे, आतापर्यंत सर्व ठेकेदारांना सिमेंट शासनामार्फत दिले जात होते ती पद्धत तुम्ही बंद करून ठेकेदारांना सिमेंट खरेदी करण्याचे नवीन नियम बनविले आहेत, हे चूक आहे. सिमेंट शासनामार्फतच ठेकेदारांना द्यायला हवे अन्यथा सिमेंटवर शासनाचे काहीच नियंत्रण राहणार नाही व ठेकेदार काय करतील याचा नेम नाही. अशी खात्याची अत्यंत वाताहत झाल्याने मला बोलणे भाग पडले आहे. आमचे सर्व अभियंते दबावात असल्याने ते बोलू शकत नाहीत. म्हणून त्या सर्वांना हिंमत यावी म्हणून मी हे बोलत आहे. सर्वांनी मिळून खाते सुधारायचे आहे. यापुढे एकाही अभियंत्याने बदलीसाठी पुढाऱ्याच्या दारात जाऊ नये. जनतेच्या पैशाशी खेळ झाला तर फार बिघडत नाही, पण जनतेच्या जिवाशी खेळ होणे फार गंभीर आहे. निदान आता तरी सर्वांनी सजग राहून सुधारण्याची गरज आहे. सर्व अभियंत्यांनी भ्रष्टाचारापासून दूर राहून आपले कर्तव्य पार पाडण्याची गरज आहे.

तसेच सर्व अभियंत्यांनी व सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केवळ पगारावर जगण्याचे व्रत जीवनात अंगीकारण्याची गरज आहे.

अभियंत्यांची बदनामी करण्याचा माझा हेतू नाही. आता परिस्थिती सचिवांच्या हाताबाहेर गेली आहे म्हणून मला बोलावे लागले. त्यात शासन सुधारावे एवढीच प्रामाणिक इच्छा आहे. दुसऱ्या कोणत्याही हेतूने असे केलेले नाही. सचिव हतबल झाले तर खाते विकले जाते हा प्रकार थांबावा हीच इच्छा. माझे काही चुकले असेल तर मोठ्या मनाने मला माफ करा आणि मी जर सत्य बोलत असेल तर माझ्या पत्राविषयी शेरेबाजी करण्याआधी मी कथन केलेल्या पार्श्वभूमीचे चिंतन करा, मनन करा, मगच प्रतिक्रिया द्या.

आपला अभियंता मित्र

विजय पांढरे

मुख्य अभियंता, मेटा, नाशिक

# ई साहित्य प्रतिष्ठान

## बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ

कसा वाटला इत्यर्थ? लेख आवडले? खुप आवडले? अगदी प्रचंड आवडले? तुम्ही आम्हाला सांगितलं तरच आम्हाला कळेल ना! तुमच्यासाठी एवढं पानंच्यापानं लिहिणाऱ्या त्या लेखक लेखिकेला, तुम्ही काही ना काही कळवलंच नाहीत तर त्या पुढचं पुस्तक तुम्हाला कसं देणार? एक ई मेल तर पाठवायची. किंवा एक फोन.

इंटरनेटमुळे कधी नाही इतकं जग जवळ आलं. अत्यंत कमी खर्चात ई पुस्तकं बनवता येऊ लागली आणि लाखो वाचकांपर्यंत वितरण करणं शक्य झालं. त्यामुळे नवनवीन लेखकांसाठी एक व्यासपीठ उभं झालं. आणि वाचकांना प्रतिक्रिया देणंही सोपं झालं.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत गाभवनाची कल्पना मांडली आहे. आपल्या घरातले वाल, वाटाणे, चवळी असतात ना! त्यांच्या आत एक छोट्टुशी पानांची जोडी असते. ही कडधान्यं जर मातीत रुजवली तर त्यातून मोड बाहेर पडतो आणि त्याचं मूळ होतं. आणि ही जी छोट्टुशी पानं असतात त्यांच्यातून बनतो वेल किंवा वृक्ष. आणि या वेलीला पुन्हा शेंगा येतात. आणि त्यातून पुन्हा हजारो दाणे. आणि त्यात पुन्हा गाभवनं. म्हणून ज्ञानोबा म्हणतात की या एका एका दाण्यात एक एक वन उभं राहिल अशी क्षमता असते. पण हा दाणा आपण भाजीत घालून खाल्ला की मात्र संपून जातो.

मानवी प्रतिभाही अशीच असते. मराठी भाषेत किती तरी प्रतिभावान व्यक्ती साहित्याच्या बागा उभारू शकतील अशा क्षमतेच्या असतात. कधी कधी त्यांना योग्यवेळी माती खत पाणी मिळत नाही. आणि त्यांच्या या साहित्याचा आनंद लोकांपर्यंत कधीच पोहोचत नाही. खत-पाणी म्हणजे वाचकांच्या प्रतिक्रिया, पत्रं, मतं, शाबासकी, दाद.

दुसरीकडे असे लाखो वाचक असतात. ज्यांना काही नवीन छान साहित्य वाचायची इच्छा असते. पण त्यांना नवीन पुस्तकं मिळत नाहीत. प्रयोग परवडत नाहीत. कोणती घ्यावीत आणि वाचावीत ते कळत नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठानने नवीन साहित्यिकांसाठी ई पुस्तकांचे व्यासपीठ उभे केले. आणि लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरित करायला सुरूवात केली.

चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना अडिचशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, शंभूराजे असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. चारशेहून अधिक नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. त्यातील अनेकजण आज यशस्वी लेखक होताना दिसत आहेत. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दहशतवाद, स्त्रियांवरील अत्याचार अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी संगीत कानसेनचे ई वर्ग चालवले. नव्या कवींचे एक सुंदर व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकांची मालिका "दुर्ग दुर्घट भारी" द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची उभारी दिली. "जिथे जिथे मराठी माणूस, तिथे तिथे ज्ञानेश्वरी" ही चळवळ आपण पहात आहातच. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबऱ्या, कॉमिक्स, गूढकथा, प्रवासवर्णनं, आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील.

सव्वा लाख रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही का वाटत आपल्याला?

त्यासाठी काही फ़ार करायची गरज नाही बंधो. एकही पैसा नका देऊ. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, **फ़क्त बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल?** जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान **१२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा**. असे लोक ज्यांनी मराठी वाचावे अशी तुमची इच्छा आहे. मराठी माणूस एकवेळ पैशांनी गरीब असेल, पण मित्रांच्या बाबतीत श्रीमंत असतो. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार? बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य पाठीराखे म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला या पुढची ई पुस्तके सर्वात आधी मिळतील. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल. होणार ना ई साहित्यचे पाठीराखे ?

आपल्या खास मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी esahity@gmail.com वर पाठवा.

खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.

www.esahity.com

www.ednyaneshwari.com

www.marathiriyasat.com